फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

Phone : (02462) २२९२४२ / ४३
Fax : (02462) २२९२४५ / २२९३२५

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

# *Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.*

---

## << *परिपत्रक* >>

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, मा.विद्या परिषद बैठकीतील विषय क्रं. **02/26-2010** च्या अनुषंगाने सर्व विद्याशाखांतील नविन व जून्या अभ्यासक्रमांबाबत झालेल्या ठरावानूसार पुढील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

ज्या शैक्षणिक वर्षापासून पदवी/पदव्यूत्तरचा नविन अभ्यासक्रम सुरू झालेला आहे, त्या वर्षापासून जून्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण विषयाचे पेपर देण्याकरीता केवळ तीनच परीक्षेच्या संधी देण्यात येतील. त्यानंतर जून्या अभ्यासक्रमानूसार अनुत्तिर्ण/एटीकेटी विद्यार्थ्यांना नविन प्रचलीत अभ्यासक्रमानूसार सर्वच विषयांचे लेखी/अंतर्गत/प्रात्यक्षीक/टर्म वर्क इत्यादी परीक्षेचे पेपर द्यावे लागतील.

जे विद्यार्थी वार्षीक अभ्यासक्रमानूसार प्रथम/व्दितीय वर्षात एटीकेटी प्राप्त करून व्दितीय/तृतीय वर्षात (सत्र पध्दती अभ्यासक्रमात) प्रवेश घेतलेले असतील किंवा घेतील, तथापी अद्यापही त्यांनी वार्षीक अभ्यासक्रमानूसार प्रथम/व्दितीय वर्षातील सर्व विषय उत्तीर्ण केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांना त्या वर्षाचे म्हणजेच प्रथम/व्दितीय वर्षाचे सत्र पध्दती अभ्यासक्रमाचे परीक्षा आवेदनपत्र भरून संबंधीत वर्षाची सत्र पध्दतीनूसार सर्व विषयांची लेखी/अंतर्गत/प्रात्यक्षीक/टर्म वर्क इत्यादी परीक्षा द्यावी लागेल.

ज्या पदवी/पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना यापूर्वीच तीन किंवा तीन पेक्षा जास्त वेळा संधी देण्यात आलेली आहे किंवा समकक्षता देण्यात आलेली आहे त्यांना उन्हाळी 2011 ही परीक्षेची शेवटची संधी राहील. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांना संधी वाढवून दिली जाणार नाही. उन्हाळी 2011 च्या परीक्षेच्या संधीनंतरही विद्यार्थी एक वा त्यापेक्षा जास्त विषयात/पेपरमध्ये अनुत्तीर्ण झाल्यास वरील प्रमाणे त्यांना नविन अभ्यासक्रमानूसार सर्व विषयांची लेखी/अंतर्गत/प्रात्यक्षीक/टर्म वर्क इत्यादीची परीक्षा द्यावी लागेल.

पान ...2... वर

फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

Phone : (02462) २२९२४२ / ४३
Fax : (02462) २२९२४५ / २२९३२५

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.**

***Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.***

---



यापुर्वी विविध विद्याशाखांनी संधी व समकक्षतेबाबत घेतलेले वेगवेगळे निर्णय याव्दारे रद्द करण्यात येत असून यानंतर सर्व विद्याशाखाच्या वार्षीक व सत्रनिहाय अभ्याक्रमासाठी हेच परिपत्रक लागू राहील.

वरील निर्णय हा सर्व विद्याशाखांच्या, पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या (सी.जी.पी.ए. अभ्यासक्रमासह) वार्षीक/सत्रनिहाय अभ्यासक्रमास लागू करण्यात येत आहे.

मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर, यांनी वरील निर्णय सर्व संबंधितांच्या विशेषत: ज्या विद्यार्थ्यावर या निर्णयाचा परिणाम होणार आहे अशा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. हा निर्णय माहित झाला नाही म्हणून त्याव्दारे एखादे न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर/संबंधित संकुलाच्या संचालकावर राहील.

''ज्ञानतीर्थ'' परिसर )(
विष्णुपूरी, नांदेड. )(
जा.क्र.शैक्षणिक/01/अभ्यासक्रम संधी/ )(
2010-2011/ 2805 )(
दिनांक : 07/12/2010 )(

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :</u>

1) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
2) संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर.
3) परीक्षा नियंत्रक, प्रस्तुत विद्यापीठ.
4) उपकुलसचिव, पदव्यूत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.